नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/१०/२०२५ (शुक्रवार )**

## नागपूर ग्रामीण पोलीसांनी साजरी केली सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती

**नागपूर ग्रामीण** :— गृहमंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली तर्फे तसेच मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडून दिनांक ३१/१०/२०२५ रोजी लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी करण्यानिमित्त 'रन फॉर युनिटी', 'वॉक फॉर युनिटी' तसेच महाराष्ट्र पोलीस दलातर्फे 'बॅन्ड डिस्प्लेवर देशभक्तीचे गीत सादर करणे' असे कार्यक्रम आयोजित करूण्याचे निर्देश प्राप्त झाले होते.

त्या अनुषंगाने नागरिकांमध्ये देशप्रेमाची, शिस्तीची, जबाबदारीची आणि एकतेची भावना निर्माण होण्याच्या हेतूने मा. पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए पोद्दार आणि मा. अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण श्री. अनिल म्हस्के यांच्या पुढाकाराने पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण तर्फे पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण परिसरात पोलीस मुख्यालय ते टेका नाका ते नारी रोड ते कपील नगर चौक ते तथागत चौक ते पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण असे 'रन फॉर युनिटी', 'वॉक फॉर युनिटी' असे कार्यक्रम पार पाडण्यात आले तसेच पोलीस मुख्यालय परिसर, नागपूर ग्रामीण येथे बॅन्ड व्दारे 'बॅन्ड डिस्प्लेवर देशभक्तीचे गीत सादर करण्यात आले. सदर सर्व कार्यक्रम श्री. अनिल म्हस्के, प्रभारी पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पाडले असून सदर कार्यक्रमात नागपूर ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयातील आणि पोलीस मुख्यालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.

त्याच प्रमाणे नागपूर ग्रामीण मधील सर्व पोलीस स्टेशन येथे पोलीस स्टेशन स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन चे

इतर पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच परिसरातील नागरिक यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन हद्दीतील प्रमुख रस्ते, लोकवस्ती व बाजार परिसरातून ‘रन फॉर युनिटी’, ‘वॉक फॉर युनिटी’ हे कार्यक्रम आयोजित करून तसेच ‘राष्ट्रीय एकतेची शपथ घेवून’ अतिशय उत्साहात सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती साजरी करण्यात येवून जनमानसात एकतेची, देशप्रेमाची व सकारात्कतेची भावना निर्माण करण्याची नागपूर ग्रामीण पोलीसांतर्फे भूमीका बजावण्यात आली.






नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दल
WALK FOR UNITY
One Nation, One Vision, One Walk...!
दि.31 ऑक्टोबर वेळ : सकाळी 6 वाजता
स्थळ : पोलीस स्टेशन कन्हानच्या समोरील रोड वर
नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दल
दि.31 ऑक्टोबर
वेळ : सकाळी 6 वाजता
स्थळ : पोलीस स्टेशन कन्हान
RUN for UNITY
एक दौड़ देश की एकता और अखंडता के लिए...
आयोजक : पोलीस स्टेशन कन्हान



## अवैधरित्या देशी, विदेशी आणि मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई
## (एकूण ६ आरोपीविरूध्द ६ गुन्हे नोंद. एकूण ७,०९० /— रू. चा मुद्देमाल जप्त)

**पोलीस स्टेशन उमरेड**:— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पो.स्टे. उमरेड येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आले. पोलीस स्टॉफ ने मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून १) **मौजा — उदासा, ता. उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारा **आरोपी नामे गणेश सुनिल राजपुत वय २४ वर्ष रा. काटोल ह.मु. राजुवाडी** वर पंचासमक्ष धाड टाकूण **२२ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण २२०० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** अन्वये गुन्हा नोंद केला तसेच **२) मौजा तारणा उमरेड** येथे अवैधरित्या देशी दारू विक्री करणारा **आरोपी नामे वंश सुखदेव तांगे वय २३ वर्ष रा. तारणा तह कुही** वर पंचासमक्ष धाड टाकूण देशी दारू संत्रा च्या १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल प्रति बॉटल ८०/— रू. प्रमाणे एकूण **४००/— रू.**

**ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला तसेच **३) मौजा कावरापेठ उमरेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **५ लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ५०० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

( अशा प्रकारे पो.स्टे. उमरेड येथे **एकूण ३ आरोपीविरूध्द ३ गुन्हे नोंद, एकूण किं. ३१००/— रू. चा मुद्देमाल जप्त** )

पोलीस स्टेशन जलालखेडा:— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. जलालखेडा हद्दीतील **मौजा पारधी बेडा उमठा ता. नरखेड** येथे अवैधरित्या हातभट्टीची मोहफुलांची गावठी दारू विक्री करणारी **महिला आरोपी नामे (अबक)** वर पंचासमक्ष धाड कारवाई करून **३० लीटर मोहफुलांची गावठी दारू** प्रति लीटर १००/— रू **प्रमाणे एकूण ३००० रू. ची दारू** जप्त करून आरोपीविरूध्द **कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा** गुन्हा नोंद केला

पोलीस स्टेशन काटोल:— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन काटोल येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. काटोल हद्दीतील **मौजा काटोल** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे चरणदास विठोबा गायकवाड वय ६० वर्ष रा. कृषी मंडी, काटोल** याचे वर पंचासह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ५ बॉटल देशी दारू संत्रा नं. १ प्रति बॉटल किं. ७०/— रू. प्रमाणे एकूण किं. **३५०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

पोलीस स्टेशन केळवद:— दिनांक ३०/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन केळवद येथे** मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीसांनी पो.स्टे. केळवद हद्दीतील **मौजा केळवद** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे रोशन नारायण देशमुख, वय ३३ वर्ष रा. तिष्टी ह.मु. वार्ड क्र. ०५ केळवद ता. सावनेर** याचे वर पंचासह छापा टाकून त्याचे जवळून १८० एम.एल. क्षमतेच्या ८ बॉटल देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ प्रति

बॉटल किं. ८०/— रू. प्रमाणे एकूण किं. **६४०/— रू. ची दारू जप्त करून** आरोपीविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला.

**(अशाप्रकारे संपूर्ण नागपूर ग्रामीण घटकात एकूण ६ आरोपीविरूध्द ६ गुन्हे नोंद व एकूण ७,०९० /— रू. चा मुद्देमाल जप्त**

## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक ३१/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन खापा** येथे श्री. जगदिश पालीवाल, पोलीस उप निरीक्षक, पोलीस स्टेशन खापा यांनी विजन ट्युशन क्लासेस, खापा येथे विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. ऑनलाईन गेमिंग च्या आर्थिक फसवणुकीला बळी पडु नका.**

**२. अधिकृत संकेतस्थळ किंवा ॲप पडताडणी करूनच खरेदी करा. अनोळखी खरेदी लिंक वर क्लिक करू नका.**

**३. मोबाईल मध्ये APK फाईल डाउनलोड करून नका.**

**४. फसव्या लोन ॲप च्या अमिषाला बळी पडु नका.**

**५. कोणत्याही आमिषाला बळी पडु नका सायबर गुन्हेगाराच्या जाळयात अडकु नका.**

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**६. जर कोणी तुम्हाला व्हीडीओ कॉल करून पोलीस अधिकारी असल्याची बतावणी करून डिजिटल अरेस्ट (अटक) करणार आहोत असे सांगुन पैशांची मागणी करत**

**असेल तर त्यांच्या वर विश्वास ठेवु नका. पोलीस कधीही ऑनलाईन किंवा फोनवरून अटक करत नाहीत.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930 , 1945 यावर तक्रार नोंदवा.**



## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३१/१०/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. अनिल म्हस्के, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. पोउपनि श्री. क्रिष्णमुर्ती लच्छना बेज्जानी नेमणूक — नक्षल सेल, नागपुर ग्रामीण जिल्हा २. श्रेणी पोउपनि श्री. सुभाष किसनराव साळवे नेमणूक — पोलीस स्टेशन काटोल, नागपूर ग्रामीण

३. सहायक पोलीस उप निरीक्षक श्री. संजय अजाबराव रिधोरकर नेमणूक – पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण ४. पोलीस हवालदार श्री. राजेश काशिराम माकडे नेमणूक – पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. अनिल म्हस्के, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. अनिल म्हस्के, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, मानव संसाधन शाखेचे प्रभारी श्रीमती ज्योत्स्ना गिरी, पोलीस उप निरीक्षक व मानव संसाधन शाखेचे अंमलदार तसेच सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचे कुटुंबिय हजर होते.



**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**